Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 360-365
DOI: 10.5281/zenodo.10128950

Original Research Article

# महात्मा गांधीच्या आर्थिक विचारांची वर्तमानकालीन प्रासंगिकता

श्री जयदीप शिवाजी चव्हाण[1], डॉ. रावसाहेब पिराजी इंगळे[2]

[1]सामाजिक शास्त्रे संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड ४३१६०६ महाराष्ट्र, भारत

[2]सह. प्राध्यापक तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख, कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय, हाडोळती. ता. अहमदपूर, जिल्हा : लातूर ४१३५१४ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: [1]chavanjaydip1983@gmail.com; [2]rpingale77@gmail.com

Received: 10 October, 2023 | Accepted: 25 October, 2023 | Published: 27 October, 2023

## गोषवारा

महात्मा गांधींचे आर्थिक विचार आणि तत्त्वज्ञान आपल्या देशाला सदा सर्वकाळ उपयुक्त आहेत. कोणताही विचार किंवा तत्त्वज्ञान जोपर्यंत प्रत्यक्ष आचरणामध्ये येत नाहीत तोपर्यंत तो विचार अगर तत्वज्ञान देशाला तारक ठरू शकत नाही. या संदर्भामध्ये महात्मा गांधींचे आर्थिक तत्वज्ञान सुद्धा देशाला संकटातून बाहेर काढू शकेल असे अनेक आर्थिक तज्ञांचे मत आहे. परंतु आपल्या देशाने अगदी 1947 पासून आर्थिक गांधीवाद प्रत्यक्ष आचरणामध्ये, धोरणामध्ये किती आणला हा महत्त्वाचा प्रश्न आहे याचाच आपल्याला विचार करावयाचा आहे गांधीवादी अर्थव्यवस्थेनुसार संपन्न समाज निर्माण करणे हे पाश्चात्य अर्थवादाचे ध्येय आहे तर प्रामुख्याने समाधानी समाज निर्माण करणे हे गांधीवादाचे ध्येय आहे. गांधीवादी अर्थव्यवस्था संपत्तीपेक्षा समाधानाला जास्त महत्व देते. महात्मा गांधींच्या मते, केवळ आर्थिक विकास, संपत्तीची निर्मिती हा खरा विकास नव्हे तर नैतिक विकास म्हणजेच सदाचारी विकास हाच खरा विकास होय.

## सूचक शब्द

ग्रास्वराज्य, खादी व ग्रामोद्योग, विश्वस्त, श्रमप्रतिष्ठा, सर्वोदय, विकेंद्रीकरण, स्वदेशी.

## प्रस्तावना

मोहनदास करमचंद गांधी हे भारताचे स्वातंत्र्यसंग्रामातील प्रमुख नेते आणि तत्वज्ञ होते. मानवाच्या उत्क्रांतीपासून आजपर्यंत समाजाला दिशा देणाऱ्या लोकांचा विचार केल्यास शंकराचार्य, येशू ख्रिस्त, भगवान महावीर, गौतम बुद्ध, महमद पैगंबर यांच्यानंतरचा त्यांचा वारसदार म्हणून महात्मा गांधीजींचे नाव घ्यावे लागेल. त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर धार्मिक ग्रंथाबरोबर टॉलस्टॉल, रस्किन आणि थोरो या आधुनिक विचारवंतांचा पगडा होता. त्यामध्ये थोरोचे ड्युटी ऑफ

सिव्हील डिसऑबिडीन्स या लेखनाचा त्यांची वैचारीक चौकट निर्माण करण्यात मोठा वाटा आहे. टॉलस्टॉयचे किंगडम ऑफ गॉड, रस्किनचे अन टू धिस लास्ट यामधूनच त्यांनी अहिंसक बुद्ध व शांततामय क्रांती अशा संकल्पना विकसित केल्या व त्यातूनच गांधीजींच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक तत्त्वज्ञान आणि त्यावर आधारित राजकीय कक्षा रुंदावल्या व त्यातून त्यांचीजडणघडण झाली. महात्मा गांधीजींनी जे आर्थिक विचार मांडले त्याला कोणत्याही अर्थशास्त्रीय सिद्धांताची शास्त्रशुद्ध अशी बैठक नव्हती. परंतु त्यांच्या विचारातून लेखनातून ज्या विविध संकल्पना मांडल्या त्याचा विचार करता अर्थशास्त्राशी संबंधित त्यांचा अभ्यास किती गाढा होता हे लक्षात येते. आजही गांधीजींच्या अर्थशास्त्रातील योगदान किती महत्त्वाचे आहे याचे महत्त्व त्यांच्या आर्थिक विचारातून स्पष्ट होते.

प्रस्तुत शोधनिबंधात महात्मा गांधी यांच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय विचारांचा आढावा घेण्यात आला आहे. महात्मा गांधी यांचे विचार सध्याच्या परिस्थितीशी जोडण्याचा प्रयत्न या शोध निबंधात केला आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे**

१. गांधीजींचे आर्थिक विचार समजावून घेणे.
२. गांधीजींच्या विचारांची सध्याच्या आर्थिक व सामाजिक स्थितीशी सांगड घालणे.

**संशोधन पद्धती**

महात्मा गांधी यांच्या आर्थिक विचारांमध्ये गांधींजींनी ज्या तत्त्वांचा वापर केला त्या तत्त्वांची आजच्या परिस्थितीतही गरज आहे. याचा अभ्यास करण्याच्या हेतूने प्रस्तुत शोधनिबंध तयार करण्यात आला आहे. यामध्ये श्रमप्रतिष्ठा, किमान गरजा कार्यक्रम, विकेंद्रीकरण, स्वदेशी व खादी यांचा वापर, ग्रामोद्योग, कुटिर उद्योग या अंगाने त्यांच्या विचारांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आला आहे. यासाठी प्रामुख्याने दुय्यम साधनसामग्रीचा अवलंब केलेला आहे पुस्तके, नियतकालिके, वर्तमानपत्रे यांचा यासाठी वापर केलेला आहे.

**गृहीतके**

१. महात्मा गांधींचे आर्थिक विचार शाश्वत आहेत.
२. महात्मा गांधींचे विचार आजच्या स्थितीला उपयुक्त आहेत.
३. महात्मा गांधींचे आर्थिक विचार

सत्य व अहिंसा या तत्त्वज्ञानाचा मुख्य आधार गांधीजींच्या विचारांना आहे. सर्व आर्थिक प्रश्न हे सत्य व अहिंसेच्या मार्गाने सोडविता येतात यावर गांधीजींचा ठाम विश्वास होता. गांधीवादामध्ये पिळवणुकी विरहित अर्थव्यवस्थेच्या निर्मितीसाठी प्रयत्न करण्यात आले. साधी राहणी, उच्च विचारसरणी, श्रमप्रतिष्ठा या विचारांची मांडणी त्यांच्या आचरणात असलेली आपल्याला आढळून येते. सर्वांना सन्मानाने जगता यावे, सहकार्य, त्याग, नैतिक मूल्य या घटकांना स्थान देणारी अर्थव्यवस्था गांधीजींना अभिप्रेत होती.

**श्रमप्रतिष्ठा**

गांधीजींनी श्रमावर आधारित समाजवादी संकल्पना मांडली आहे त्यांनी मला महत्त्वाचे स्थान दिले प्रत्येकाने आपले काम आपण करावे म्हणजेच प्रत्येकाने स्वावलंबी असणे आवश्यक आहे. स्वतःच्या जमिनीत आपल्याला आवश्यक तेवढ्या प्रमाणात स्वतः अंग मेहनत करून अन्नधान्य पिकवावे हेच शेतकऱ्यांचे खरे जीवन होय. शारीरिक कष्टामुळे श्रमाचे

महत्त्व लक्षात येते. श्रम केल्यामुळे शरीर निरोगी बनते, सुदृढ राहते. यासाठी प्रत्येकाने श्रम करणे आवश्यक आहे म्हणून त्यांनी श्रमदानाचा विचार मांडला. श्रमदान हे सर्वश्रेष्ठ दान असल्याचे त्यांचे मत होते.

**ग्राम स्वराज्य**

खेड्याकडे चला हा गांधीजींचा मूलमंत्र होता, खरा भारत हा खेड्यात राहतो असे त्यांचे मत होते. प्रत्येक खेडे हे स्वयंपूर्ण झाले पाहिजे असे त्यांचे मत होते. गांधीजींनी आदर्श खेड्याची संकल्पना मांडली आहे. गांधीजींनी खेड्यांच्या कल्याणाच्या विकासाच्या योजना लोकांच्या पुढे मांडण्यासाठी सेवाग्राम हे एक केंद्र सुरू केले. जे खेडे अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण असेल जेथे दवाखाना, शाळा, स्वच्छ रस्ते, समाज मंदिरे, फळझाडे, सार्वजनिक हॉल, उत्तम सहकार, न्यायदान, पंचायत असेल असे खेडे हे स्वयंनिर्भर व विकसित बनते.

**सर्वोदय**

सर्वोदय म्हणजे सर्वांचे कल्याण होय. सर्वोदय ही गांधी प्रणित समाजवादाची संकल्पना आहे, ती व्यक्ती विकास नसून,ती व्यक्ती वादी ही नाही. यामध्ये समाजाच्या विकासावर भर दिला आहे सर्वोदय या संकल्पनेत गरीब - श्रीमंत, सर्व वर्गांचे कल्याण अपेक्षित आहे. त्याचबरोबर मानवी जीवनाच्या विविध अंगांचा विकास हा सर्वोदयाचे ध्येय आहे यामध्ये आर्थिक स्वावलंबन, सत्तेचे विकेंद्रीकरण, उद्योगधंदे, यंत्रांचा मर्यादित वापर यांचा समावेश होतो. सर्वोदय समाजात मनुष्याची प्रतिष्ठा, त्यांचा चांगलेपणा, प्रेम, बंधुभाव, जिव्हाळा या घटकांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. यातूनच मानवाचा सर्वांगीण विकास साध्य करण्याचा उद्देश सफल होतो.

**आर्थिक विकेंद्रीकरण**

महात्मा गांधी यांच्या विचारात आर्थिक विकेंद्रीकरणाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. लोकशाहीत विकेंद्रीकरण अत्यंत आवश्यक आहे. आर्थिक विकेंद्रीकरणामुळे उत्पन्न संपत्तीच्या वितरणामधील विषमता कमी होऊन स्वराज्य निर्मितीस महत्त्व प्राप्त होते. महात्मा गांधीजींची अशी धारणा होते की, सुत कातण्याचा चरखा हा ग्रामीण उद्योगधंद्याच्या विकासाचा पाया आहे आणि हा चरखा म्हणजे आर्थिक विकेंद्रीकरणाचा चरखा आहे आणि तो आर्थिक विकासाचा मूलबिंदू ठरेल आणि विकेंद्रीकरणांमध्ये स्थानिक संसाधनाचा वापर अपेक्षित होता. महात्मा गांधीजींची अशी धरणा होती की, सूत कातण्याचा चरखा हा ग्रामीण उद्योगधंद्याच्या विकासाचा पाया आहे. आर्थिक विकेंद्रीकरणामुळे संपत्तीच्या वितरणातील विषमता कमी होते व राष्ट्रनिर्मिती सहाय्य होते. लघु व कुटिरोद्योग हे एका विशिष्ट समाजाशी निगडित असून ते श्रमप्रदान असल्याने ग्रामीण भागातील लोकांच्या हाताला काम उपलब्ध करून देतात.

**यंत्राचा मर्यादित वापर**

महात्मा गांधी यांचा यंत्रसामग्रीस विरोध नव्हता परंतु यंत्राच्या अतिवापरास, अविवेकी वापरास त्यांचा विरोध होता. मानवाच्या विकासास हातभार लावण्याचे साधन म्हणून यंत्रांचा वापर होणे त्यांना अभिप्रेत होते नाही की मानवानेच यंत्र बनावे. त्यांच्या मते यंत्राच्या वापरामुळे मोठ्या प्रमाणात बेकारी निर्माण होते संपत्तीचे केंद्रीकरण होते, मालक - नोकर असा भेद निर्माण होतो म्हणून याला गांधीजींचा विरोध होता यंत्रामुळे मानव जातीचा विकास व्हावा, त्यांच्या कौशल्यात भर पडावी असे त्यांचे मत होते. श्रम विभागणी, यंत्रांचा मोठ्या प्रमाणात वापर, यावर आधारित मोठ्या प्रमाणावरील उत्पादन हा मानव जातीला शाप आहे कारण यामुळे निर्माण होणारे प्रदूषण, गलिच्छ वस्त्यांची

वाढ, अपघात, वाढते शहरीकरण, निर्माण होणारे प्रदूषण, नैतिक मूल्यांचा ऱ्हास यामुळे गांधीजींचा यांत्रिकीकरणाला विरोध होता.

**स्वदेशी व खादीचा वापर**

महात्मा गांधी यांनी स्वदेशी वस्तूंचा आपल्या दैनंदिन जीवनात असणारा उपयोग विशद करून त्यासाठी मोठी चळवळ उभारली. खादीच्या वापराचे त्यांनी लोकांना आवाहन केले. यामागे भारतीय अर्थव्यवस्थेला स्वयंपूर्ण बनविण्याचा त्यांचा हेतू होता. गांधीजींनी परदेशी ऐवजी स्वदेशी वस्तूंच्या वापराचा आग्रह धरला. त्यांना परदेशी वस्तूंचे आकर्षण मान्य नव्हते अर्थात काही अति महत्त्वाच्या वस्तू परदेशातून आयात करणे अपरिहार्य आहे याचीही त्यांना जाणीव होती. प्रत्येक भारतीयाने स्वदेशी वस्तूंचा वापर करावा असा त्यांचा आग्रह होता. स्वदेशी चळवळीचाच एक भाग म्हणून खादीचा वापर होय. खादी उद्योग हा ग्रामीण अर्थव्यवस्थेला उभारी देणारा एक उद्योग आहेत असे त्यांचे मत होते.

**शेती विषयक विचार**

शेतकरी हा भारताचा प्रमुख घटक असून तो समाजाचा कणा आहे. कसेल त्याची जमीन झाली व उत्पन्न वाढले तरच समृद्ध भारताची उभारणी करणे शक्य आहे याची त्यांना जाणीव होती. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले, त्यांचा आर्थिक विकास झाला तरच समाजाचा विकास होईल समाजाच्या विकासावरच देशाचा विकास अवलंबून असतो याचे त्यांना भान होते. शेतकऱ्यांच्या शेतीच्या मालाला योग्य बाजारपेठ उपलब्ध व्हावी, त्यांच्या मालाला योग्य किंमत मिळावी या उद्देशाने त्यांनी कृषी बाजार ही संकल्पना मांडली आणि ती राबवली सुद्धा.

**भारतातील सद्यस्थिती आणि गांधीजींचे विचार**

महात्मा गांधीजींचे विचार हे शाश्वत मूल्यावर आधारलेले आहेत. ते सत्य अहिंसा या नैतिक मूल्यावर आधारलेले आहेत. गांधीजींचे विचार वास्तव परिस्थिती ही खरे ठरणारे आहेत. भविष्यात आर्थिक प्रगतीमुळे जे धोके निर्माण होणार आहेत ते धोके महात्मा गांधीजींनी वेळोवेळी स्पष्ट केलेले होते. आज आपण त्यांच्याच विचारांच्या आधारावर या धोक्यांचा सामना करत आहोत. भारताच्या बदलत्या परिस्थितीतही गांधीजींच्या विचारांचे महत्त्व कमी झालेले नाही.

**यांत्रिकीकरणाचा वापर**

आज तांत्रिक प्रगती झपाट्याने होत आहे अगदी आपल्या देशाने चंद्रावरील चंद्रयान मोहीम ही यशस्वी केलेली आहे. आधुनिक यंत्र तंत्राचा वापर मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे परंतु या वाढत्या आधुनिक तंत्रज्ञानाचे काही तोटेही समाजाला प्रत्यक्ष- अप्रत्यक्षरीत्या भोगावे लागत आहेत हेही विसरून चालणार नाही. भ्रमणध्वनी सारख्या यंत्राचा वापर आज मोठ्या प्रमाणात वाढत असलेला आपल्याला दिसतो या यंत्रामुळे जग अगदी जवळ आले आहे परंतु याचे दोषी तितकेच विचार करायला लावणारे आहेत शालेय विद्यार्थी महाविद्यालय योग युक्ती यांचा भ्रमणध्वनीचे व्यसन लागले आहे याचा आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे याचा जर चुकीचा किंवा अयोग्य वापर टाळला गेला तर मानवी समाजाचा भविष्यकाळ निश्चितच उज्वल असेल.

**श्रमप्रतिष्ठा**

आधुनिक जगात तांत्रिक प्रगती जसजशी होत गेली तसतसे मानव हा ऐषआरामी मी बनत आहे.कमी श्रमात त्याच्या सर्व गरजा पूर्ण होत असल्याने त्याची श्रम करण्याची प्रवृत्ती कमी होऊ लागली आहे. याचा वाईट परिणाम त्याच्या आरोग्यावर होत आहे मधुमेह, हृदयरोग, उच्च रक्तदाब यासारख्या व्याधींनी त्यांना जखडलेले आहे. प्रत्येकाने श्रम

करणे अत्यावश्यक आहे असे गांधीजींचे मत होते त्यातूनच सुखी समृद्ध निरोगी जीवनाचे स्वप्न साकारता येईल असे ते म्हणत.

**ग्रामस्वराज**

खऱ्या भारताचे दर्शन खेड्यात होत असल्याने गांधीजींनी खेड्याकडे चला अशी हाक दिली ज्यामध्ये गाव खेड्यांचे सक्षमीकरण करणे हा महत्त्वाचा हेतू होता. आजही या अभिनव मोहिमेची उपयुक्तता जाणवत असून शहरातील वाढत्या रोजगारीचा प्रश्न, वाढती गर्दी झोपडपट्टी या सारख्या आर्थिक समस्यांचे निराकरण करण्याचा मार्ग हा गांधीजींच्या मूलमंत्रामध्ये सुचतो. गांधींच्या खेड्याकडेच चला या मूलमंत्राची दखल घेऊन गाव खेड्याच्या विकासासाठी नवनवीन योजना आखल्या जात आहेत. या मूलभूत मूलमंत्रामुळे गाव खेडी प्रकर्षाने अधोरेखित होऊन प्रगतीचा मार्ग तयार झालेला आहे. सध्या विकासासाठी अनेक योजना राबवल्या गेल्या त्याचा चांगला परिणाम खेड्यांवर झालेला आहे. खेड्यात प्राथमिक, माध्यमिक तसेच उच्च शिक्षणाच्या सोयी, रस्ते, पाणीपुरवठ्याच्या सोयी निर्माण केल्या गेल्या यामधून गांधीजींच्या विचारांचा वसा आणि वारसा पुढे चालू आहे असे दिसून येते.

**स्वदेशी चळवळ आणि खादीचा वापर**

महात्मा गांधींनी परदेशी वस्तू वापरा ऐवजी स्वदेशी वस्तू वापराचा जो पुरस्कार केला त्याच्या पाठीमागे एक मोठा आर्थिक विचार दिसून येतो. सरकारच्या 'मेक इन इंडिया' या उपक्रमाचा भाग म्हणून आयुष मंत्रालयाने 2017 मध्ये स्वदेशी शॉपिंगला प्रोत्साहन दिले. भारताच्या सद्यस्थितीचा विचार करता भारताची आयात मोठ्या प्रमाणात वाढत आहे याचे परिणाम म्हणजे भारताच्या रुपयाचे मूल्य घसरत आहे यावर स्वदेशी मालाचा वापर हा उपाय आपल्या देशाला उपयुक्त ठरू शकतो. स्वदेशी ही वस्तू नसून भावना आहे त्यामुळे आजही स्वदेशी चळवळीची देशाला गरज आहे. देशातल्या प्रत्येकाने आपल्या देशात निर्माण झालेल्या वस्तूंचा वापर करणे आवश्यक आहे अन्यथा आपण आर्थिक गुलामगिरीतून जाऊ शकतो. त्याचप्रमाणे आज फॅशनच्या युगातही खादी आपले अस्तित्व टिकवून आहे.खादीसाठी अलीकडे अनुकूल वातावरण होत असल्याने खादी ग्राम उद्योगाच्या विक्रीच्या आकड्यांनी कोटींच्या कोटी उड्डाणे घेतले आहेत असे दिसते. सन 2022 - 23 मध्ये १ कोटी 34 लाख कोटी रुपये इतकी खादी ग्राम उद्योगाची उलाढाल वाढलेली आहे.

**विश्वस्ताची कल्पना**

भारतात आजही जवळजवळ 30% लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली आहे यामध्ये भारतातील आर्थिक विषमता हे कारण सांगता येते देशातील मूठभर लोकांच्याकडे संपत्तीचे केंद्रीकरण झालेले आहे. गरीब हा अधिकच गरीब होत चालला आहे, तर श्रीमंत अधिक श्रीमंत होत चालला आहे. गांधीजींनी जी विश्वस्ताची संकल्पना मांडली आहे. या संकल्पनेला जर स्वीकारले गेले तर बराच मोठा प्रभाव गरिबीवर पडू शकेल.

**निष्कर्ष**

1. महात्मा गांधींचे आर्थिक विचार शाश्वत आहेत.
2. महात्मा गांधींचे विचार आजच्या स्थितीला उपयुक्त आहेत.

## संदर्भ सूची


1. प्रा.डॉ. पाटील जे. एफ. : आर्थिक विचारांचा इतिहास
2. महात्मा गांधी : माझ्या स्वप्नातील भारत : साकेत प्रकाशन.
3. केळकर श्रीपाद : असहकाराचे आंदोलन : कॉन्टिनेन्टल प्रकाशन.
4. प्रा. डॉ. जे. एस. पाटील /प्रा.डॉ.जे.एफ. पाटील : महात्मा गांधींचे आर्थिक विचार व सद्यस्थिती.
5. रायखेलकर : आर्थिक विचारांचा इतिहास.
6. ताटके अरविंद : महात्मा गांधी, सरिता प्रकाशन, पुणे, १९९४